दिनांक 06/02/2024

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभाग, सांस्कृतिक संचालनालय, आणि सातारा जिल्हा प्रशासनाच्या वतीने गुरुवार दिनांक 08 फेब्रूवारी 2024 ते दिनांक 11 फेब्रूवारी 2024 अखेर, राजधानी महासंस्कृती मोहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवातील आयोजित कार्यक्रमांना सातारकर नागरीकांनी आवर्जुन उपस्थित रहावे असे आवाहन आज मुख्याधिकारी अभिजित बापट यांनी केले आहे.

या सांस्कृतिक महोत्सवामध्ये फलटण, क-हाड, वाई, महाबळेश्वर आणि सातारा येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन अनुक्रम शिवव्याख्यान व विदयार्थांसाठी चित्रकला स्पर्धा, जागर लोककलेचा व विदयार्थ्यांचे ऐतिहासिक प्रवेश सादरीकरण, देशभक्तीचे व शालेय व महाविदयालयीन विदयार्थाकरीता वक्तृत्व स्पर्धा, फलॅश मॉब व मैदानी खेळांचे प्रात्यक्षिक, असे विविध कार्यक्रमांचे आयोजित करण्यात आले आहे.

याच सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत, जिल्हा प्रशासनाच्या वतीने, सातारा येथील श्री शाहुकला मंदिर, येथे दिनांक 08 फेब्रुवारी  ते 10 फेब्रुवारी 24 अखेर महिला बचत गटांनी उत्पादीत केलेल्या विविध वस्तुंचे प्रदर्शन तसेच शाहु कला मंदिर येथेच सायंकाळी 6.00 वाजता,  नृत्य कला प्रशिक्षक आणि नृत्य दिग्दर्शक पंकज चव्हाण यांच्या डान्स ॲकॅडमीचा कलर्स ऑफ इंडीया हा बहारदार लोकगीतांचा आणि देशभक्तीपर गीतांचा कार्यकम होणार आहे.

तसेच रविवार दिनांक 11 फेब्रूवारी 2024 रोजी सकाळी 9.00 वाजता म. गांधी मैदान, राजवाडा ते पोवईनाका शिवतीर्थ अखेर मार्गावरुन  भव्य शोभा यात्रेचे आयोजन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

तसेच सायंकाळी म्हणजेच दि.11 फेब्रूवारी 24 रोजी सायंकाळी 6.00 वाजता, जिल्हा परिषद मैदान येथे सातारा जिल्हयाचे पालकमंत्री ना.श्री. शंभुराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली मैदानावर भव्य दिव्य राजधानी गौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या गौरव सोहळयास, खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, खासदार श्री. श्रीनिवास पाटील, खासदार रणजीतसिंह नाईक-निंबाळकर, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष मा.आ.श्री.नरेंद्र पाटील, महाराष्ट्र कृष्णाखोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष मा.आ.श्री. महेश शिंदे, विधानपरिषदेचे सदस्य आमदार श्रीमंत रामराजे नाईक-निंबाळकर, मा.आमदार श्री.शशिकांत शिंदे, मा.आ.श्री.जयंत आसगांवकर, मा.आ.श्री.अरुण लाड, मा.आ.श्री.महादेव जानकर, विधानसभा सदस्य मा.आ. पृथ्वीराज चव्हाण, मा.आ.श्री.श्रीमंत छ.शिवेंद्रसिंहराजे भोसले, मा.आ.श्री.बाळासाहेब पाटील, मा.आ.श्री.जयकुमार गोरे, मा.आ.श्री. मकरंद पाटील, मा.आ.श्री. दिपक चव्हाण हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. तसेच या कार्यक्रमाचे निमंत्रक जिल्हाधिकारी श्री. जितेंद्र डुडी (भा.प्र.से), श्री. समीर शेख (भा.पो.से) व श्रीम. याशनी नागराजन (भा.प्र.से) यांनीही वरील कार्यक्रमामध्ये नागरीकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

या सर्व कार्यक्रमांना सातारा शहरातील व जिल्हयातील तमाम नागरीकांना मोफत प्रवेश आहे तरी सर्व नागरीकांनी उपस्थित राहून आयोजित कार्यक्रमांचा लाभ़ घ्यावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने सातारा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक अभिजीत बापट यांनी केले आहे.

(अभिजीत बापट)
मुख्याधिकारी तथा प्रशासक,
सातारा नगरपरिषद,सातारा.

प्रति,
संपादक
दै.--------------------सातारा.

वरील मजकूर आपल्या दैनिकात बातमी या स्वरुपांत प्रसिध्द करावा. ही विनंती.

(अभिजीत बापट)
मुख्याधिकारी तथा प्रशासक,
सातारा नगरपरिषद,सातारा.